| **RAHUL MILIND SONTAKEE & SONAL SANJAY KHADEKAR.** **NPA DATE** 01-11-2025 **Possession Date** 27-03-2026 | ALL THAT PIECE AND PARCEL OF LAND BEARING OF PLOT NO. 46 (FORTY SIX) TOTAL AREA ADMEASURING 109.60 SQ. MTRS. (I.E. 1179.34 SQ. FTS.), BEING A PART AND PORTION OF THE LAND BEARING SURVEY/KHASRA NO. 27/4/1, P.H. NO. 7, IN THE LAYOUT OF OM HOUSING AGENCY, NAGPUR, BEARING SHEET NO. 30, CITY SURVEY NO. 266, SITUATED AT CORPORATION HOUSE NO. 773/27/4/1/46, OF MOUZA DABHA WITHIN THE LIMITS OF NAGPUR IMPROVEMEN: TRUST AND NAGPUR MUNICIPAL CORPORATION, NAGPUR, IN TAHSIL DISTRICT NAGPUR AND BOUNDED AS: ON THE EAST: B 6 MTRS. ROAD, ON THE WEST: BY PLOT NO 42 ON THE NORTH: BY PLOT NO. 47. ON THE SOUTH: BY PLOT NO. 45. | **INR 1473074/-** (Rupees Fourteen Lakhs Seventy Three Thousand Seventy Four Only ) Dated 17-11-2025 | **INR 1592231/-** (Rupees Fifteen Lakhs Ninety Two Thousand Two Hundred Thirty One Only ) | **INR 159223/-** (Rupees One Lakh Fifty Nine Thousand Two Hundred Twenty Three Only ) | 01-05-2026 | 02-05-2026 | 30-04-2026 between 11:00 am to 04:00 pm. |
| **RANJEET SINGH & MEGHA RANJEET SINGH.** **NPA DATE** 01-11-2025 **Possession Date** 28-03-2026 | ALL THAT PIECE & PARCEL OF APARTMENT NO. B4-B-202, ON SECOND FLOOR, IN BLOCK NO. B4, BUILDING NO. B, HAVING CARPET AREA ADMEASURING ABOUT 89.37 SQ. MTRS. & SUPER BUILT UP AREA ADMEASURING ABOUT 126.57 SQ. MTRS., COVERED IN 3 BEDROOM, 1 KITCHEN & 1 HALL ALONG WITH LATRINE & BATH TOGETHER WITH 0.0519% UNDIVIDED PROPORTIONATE SHARE IN PLOT OF LAND ON "AS IS WHERE IS BASIS" IN THE CLUSTER KNOWN AS "NAND" BEING THE PORTION OF "VRINDAVAN" CONSTRUCTED ON SAID PROPERTY, i.e., PLOT NO. 7 PH NO. 42 MOUZA JAMITHA TAH NAGPUR RURAL AND DISTRICT VRINDAVAN NAND BLOCK NO. B4 BUILDING SURVEY NO. 248, 257, 2/258/1 G AND 258/1 K 258/2, NAGPUR NEAR VRINDAVAN CITY TOWN SHIP NAGPUR MAHARASHTRA 441108. EAST: ROAD, WEST: APARTMENT NO. B4-B-203, NORTH: APARTMENT NO. B4-B-201, SOUTH: TOWER C | **INR 5061263/-** (Rupees Fifty Lakhs Sixty One Thousand Two Hundred Sixty Three Only) Dated 10-11-2025 | **INR 3218205/-** (Rupees Thirty Two Lakhs Eighteen Thousand Two Hundred Five Only ) | **INR 321820/-** (Rupees Three Lakhs Twenty One Thousand Eight Hundred Twenty Only ) | 01-05-2026 | 02-05-2026 | 30-04-2026 between 11:00 am to 04:00 pm |

For detailed terms and conditions of the sale, please refer to the link provided in Aditya Birla Housing Finance Limited/Secured Creditor's website i.e. **https://homefinance.adityabirlacapital.com/properties-for-auction-under-sarfaesi-act** or i.e. **https://sarfaesi.auctiontiger.net**

**Date:10-04-2026, Place:-NAGPUR** | **Sd/-Authorized Officer - (Aditya Birla Housing Finance Limited)**

## सहवेदना

### विलासराव यादव



**कोल्हापूर :** शिवाजी पेठ, आयरेकर गल्ली येथील विलासराव महादेव यादव (वय ७४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन, शुक्रवारी, १० रोजी आहे.

### भरत परब



**कोल्हापूर :** राजारामपुरीतील कोंडुसकर ऑटो सेंटर येथील मॅनेजर भरत पांडुरंग परब (वय ६३) रा. शिवाजी पार्क यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे. रक्षाविसर्जन शुक्रवारी, सावंतवाडी तालुक्यातील पारपोली येथे आहे.

### अनुसया तांदळे



**कुदनूर :** येथील श्रीमती अनुसया नारायण तांदळे (वय.७६) निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन सोमवारी आहे. पत्रकार सचिन तांदळे यांच्या त्या काकी होत.

### शंकर उगारे



**कोल्हापूर :** अर्जुनवाड (ता. शिरोळ) येथील शंकर राऊ उगारे (वय ८२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

## सीपीआर पट्टा

### अपघातात महिला जखमी

**कोल्हापूर :** भादुले पेठवडगाव येथे दुचाकीवरून पडून महिला जखमी झाली. भारती रमेश तोडकर (वय ४६ रा पिशवी ता शाहूवाडी) असे जखमीचे नाव आहे. ही घटना गुरुवारी सकाळी घडली. जखमीला उपचारासाठी कोल्हापूर येथे खासगी रुग्णालयामध्ये दाखल केले. पुढील उपचारासाठी सीपीआर मध्ये दाखल केले.

### किरकोळ कारणातून तरुणास मारहाण

**कोल्हापूर :** मनपाडळे येथे किरकोळ कारणातून झालेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. शुभम शिवाजी कदम (वय २७ रा उचगाव ता करवीर) असे जखमीचे नाव आहे. ही घटना बुधवारी रात्री घडली. घटनेला उपचारासाठी पारगाव येथील रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी सीपीआर मध्ये दाखल केले.

### मारहाणीत तरुण जखमी

**कोल्हापूर :** सोनाई चौक कनाननगर येथे किरकोळ कारणातून झालेल्या मारहाणीत तरुण जखमी झाला. अविनाश भरत तलवारे (वय २२ रा सोनाई चौक कनान नगर कोल्हापूर) असे जखमीचे नाव आहे. ही घटना बुधवारी रात्री घडली. जखमीला उपचारासाठी सीपीआरमध्ये दाखल केले.

### कणेरी येथे चिमुरड्यास सर्पदंश

**कोल्हापूर :** कनेरी येथे राहत्या घराशेजारी खेळत असताना चिमुरड्यास सर्पदंश झाल्याने अत्यावस्थ झाला. रुद्र धनंजय शिंदे (वय ३) असे त्याचे नाव आहे. ही घटना गुरुवारी घडली. नातेवाईकांनी त्याला उपचारासाठी सीपीआरमध्ये दाखल केले याची नोंद सीआर पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकी घसरून तरुण जखमी

**कोल्हापूर :** रजपूतवाडी येथे दुचाकी घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला. सुरेंद्र संदीप चोपडे (वय २८ रा बुरुड गल्ली कोल्हापूर) असे जखमीचे नाव आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली.

---

### चाकूचा धाक दाखवून लुटणारे तासाभरात गजाआड

# आंबा घाटात लुटमारीचा थरार

**रत्नागिरीहून कोल्हापूरच्या दिशेने जाणारी कार आंबा घाटातील दख्खन येथे अडवून चालकाला चाकूचा धाक दाखवत त्याच्याकडील २५ हजाराची रोख रक्कम लुटल्याप्रकरणी पोलिसांनी थरारक पाठलाग करत रत्नागिरी तालुक्यातील पाच तरुणांच्या मुसक्या तासाभरातच आवळल्या. अन्य तिघे अद्याप पसार आहेत. दरोड्याच्या या गुन्ह्यातील चाकू, दोन कार पोलिसांनी जप्त केली आहे. बुधवारी रात्री ९ वाजता हा प्रकार घडला.**

- थरारक पाठलाग करत पोलिसांनी आवळल्या पाच जणांच्या मुसक्या, तिघे पसार

**५ दिवसांची पोलीस कोठडी**

**पाचही आरोपींना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायाधीशांनी त्यांना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.**

**वार्ताहर, आंबा**

फरहान रशिद मुल्ला (रा. रत्नागिरी, ४२), प्रथमेश सचिन भाटकर (गोळप, २४), सर्वेश सुभाष कीर (सोमेश्वर कीरबाग, २२), धर्मलिंगम विजयकुमार नाडर (कुवारबाव, २६), भूषण बिपेंद्र सावंत (रा. मिऱ्या, २६) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. फिर्याद प्रथमेश दळवी (रा. शाहूवाडी कोल्हापूर) याने पोलिसात दिली आहे.

प्रथमेश हा आपल्या ताब्यातील बोलेरो गाडीमध्ये रत्नागिरी तालुक्यातील वेतोशी येथील म्हैस भरून बुधवारी सायंकाळी सांगली शिराळा येथे जाण्यासाठी कोल्हापूरच्या दिशेने निघाला होता. यादरम्यान संशयितांनी त्यांच्याकडील थार व कारने प्रथमेश दळवीचा पाठलाग करून आंबा घाटातील दख्खन येथे त्याला गाठले. बोलेरोच्या मागे एक व पुढे एक अशी कार लावण्यात आली. दोन्ही वाहनातून ८ अज्ञात इसम खाली उतरले अन् प्रथमेश याला मारहाण व शिवीगाळ केली. धमकी देत त्याच्याकडे ५० हजार रुपयांची मागणी केली. अनोळखी इसमांनी बोलेरोदेखील साखरपा येथे आणली. गाडीतील २५ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले.

**प्रथमेशचा मोबाईल केला 'फॉरमॅट'**

प्रथमेश याचा कोणाशी संपर्क होऊ नये म्हणून अज्ञातांनी त्याचा मोबाईल फॉरमॅट केला. आंबा घाट सोडल्यानंतर त्याने मार्गावरून प्रवास करणाऱ्या व्यक्तीच्या मोबाईलवरून बोलेरो मालक तानाजी पाटील यांच्याशी संपर्क साधून घडलेला प्रकार सांगितला. पाटील यांनी तात्काळ साखरपा दूरक्षेत्राशी संपर्क साधून हकीकत कथन केली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वत्र नाकाबंदी करण्यात आली याचदरम्यान कळकदरा येथे खडीकोळवण गावच्या दिशेने एक इनोव्हा कार संशयास्पद दिसून आली. ८ पैकी तिघे निसटले आणि ५ जण पोलिसांच्या तावडीत सापडले. त्यांना देवरुख पोलीस ठाण्यात आणण्यात आले. खाकी वर्दीचा हिसका दाखवताच त्यांनी लुटमारीची कबुली दिली.

---

# केएसबीपी पार्क परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई

### १९ हातगाड्या, ४ काऊंटर अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून जप्त

**त. भा.प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** महापालिकेच्या विभागीय कार्यालय क्रं.३ राजारामपुरी आणि अतिक्रमण निर्मुलन पथकामार्फत गुरूवारी के.एस.बी.पी. पार्क परिसरात अवैध अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली. यावेळी २ लोखडी अँगल, १ टेबल, २ हातगाडी, ४ कांऊंटर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. यावेळी १९ हातगाड्या मालकांनी स्वतःहून काढून घेतल्या.

सोमवारी झालेल्या जनता दरबारमध्ये अतिक्रमणाबाबत तक्रार अर्ज दाखल झाला होता. त्याच्या अनुषंगाने आणि महापौर सौ. रुपाराणी निकम यांनी दिलेल्या आदेशानुसार महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत केलेल्या या कारवाई दरम्यान १ जेसीबी, २ ट्रॅक्टर ट्रॉली व १ डंपरचा वापर करण्यात आला.

ही कारवाई अतिरिक्त आयुक्त शिल्पा दरेकर, उप-आयुक्त किरणकुमार धनवाडे, सहायक आयुक्त जयंत जावडेकर, शहर अभियंता रमेश मस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली, उप-शहर अभियंता अरुण गुजर, अतिक्रमण प्रमुख प्रफुल्ल कांबळे, कनिष्ठ लिपीक सजन नागलोत, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व विभागीय कार्यालय क्र.०३ कडील कर्मचाऱ्यांच्या पथकाकडून करण्यात आली.

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने येथून पुढेही शहरामध्ये अनधिकृत फेरीवाले व रोडवरील दुकानाबाहेर लावण्यात आलेल्या अनाधिकृत शेडवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

त्यामुळे संबंधित दुकानधारकांनी, फेरीवाल्यांनी आपले अनधिकृत अतिक्रमण स्वतः काढून घ्यावा। असे आवाहन अतिक्रमण विभागाने केले आहे.



---

# जिल्ह्यातील संतप्त कंत्राटदार रस्त्यावर

**त. भा.प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शासकीय कामे केलेल्या राज्यातील कंत्राटदरांची कोट्यवधींची थकबाकी आहे. थकित बीले मिळण्यासाठी गुरुवारी कोल्हापूर जिल्हा शासकीय ठेकेदार संघाच्या नेतृत्वाखाली ५०० पेक्षा अधिक कंत्राटदारांनी रस्त्यावर उतरुन शासनाचा निषेध केला. महिना अखेरपर्यंत देयके मिळाली नाही तर राज्यात काम चालू न देण्याचा इशारा दिला आहे.

शासकीय ठेकेदारांनी आपल्या खिशातील पैसे घालून शासनाची कामे केली. पण गेल्या चार वर्षात महाराष्ट्र शासनाने कंत्राटदारांना कधीही १०० टक्के अनुदान देऊन त्यांची थकबाकी दिली नाही असा आरोप संघाने केला आहे. शासन कोणताही निर्णय घेत नाही. मागील वर्षात दोन वेळा अनुदान वितरित झाले आहे. सर्व मिळून अंदाजे २५ टक्केपर्यंत अनुदान आहे. महाराष्ट्र कंत्राटदार महासंघांचे महासचिव सुनिल नागराळे, कुलदीप पाटील, संजय पाटील, सुरेश नलवडे रमेश भोजकर, किशोर जामदार, संदीप सावंत यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

**शासनाच्या विविध विभागाकडील थकबाकी**

| | |
|---|---|
| सार्वजनिक बांधकाम विभाग– | २९ हजार कोटी |
| जलजीवन मिशन, महाराष्ट्र राज्य जीवन प्राधिकरण– | ३५ हजार कोटी |
| ग्रामविकास व जलसंधारण विभाग | ६ हजार ५०० कोटी |
| पर्यटन विकास महामंडळ | २१०० कोटी |
| जलसंपदा विभाग | ११ हजार कोटी |

---


# पाहिजेत

कागल पंचतारांकित औद्योगिक वसाहतीतील आमचे पॅकेजिंग युनिटसाठी

**१. कोरोगेशन मशीन ऑपरेटर : २ जागा**

डबल प्रोफाईल ( B & C फ्लूट ) कॉरोगेशन मशीनसाठी अनुभवी कुशल ऑपरेटर पाहिजे आहे.

**प्रिमिअर प्रिंटर्स**
A८३/१, कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्यो. वसाहत, कागल, जि. कोल्हापूर.
फोन: ८८०६४८१२४२


---

जावक क्र/वनप/ ६३/२०२६-२७
दि.९/०४/२०२६

## वडगाव नगरपरिषद, वडगाव, जि. कोल्हापूर.
## जाहीर वार्षिक निविदा सूचना

वडगाव नगरपरिषद सन २०२६-२७ सालाकरिता व पुढील वर्षातील कामाच्या निविदांचे कामाचे आदेश होईपर्यंत आवश्यकतेनुसार मक्तेदारांकडून वडगाव नगरपरिषद कार्यालयातील विविध विभागाकडील कामाकरिता सिलबंद निविदा मागविणे आवश्यक आहे. त्यांचा तपशील वडगाव नगरपरिषद कार्यालयातील नागरी सुविधा केंद्र तसेच https://mahaulb.in/MahaULB/home/ulblist/viewmore या वेब साईटवर उपलब्ध आहे.

वरील सर्व कामांच्या निविदा नगरपरिषद कार्यालयात सुट्टीखेरीज कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु.३.०० वाजता या वेळेत दि. १०/०४/२०२६ ते दि.२२/०४/२०२६ या कालावधीत विक्रीस उपलब्ध आहेत. सुवाच्य अक्षरात भरलेल्या निविदा दि. २३/०४/२०२६ रोजी सायं. ०४.३० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात स्वीकारणेत येतील. दिलेले निविदा शक्य झालेस दि. २३/०४/२०२६ सायं. ०५.०० वाजता मुख्याधिकारी यांचे समोर उघडणेत येतील. सदर कामाचे स्वरूप, निविदा फॉर्म इ. विषयाची माहिती सर्व अटी व शर्तीसह कार्यालयात पहावयास मिळतील. तसेच सदर निविदा द्वि-लिफाफा पद्धतीने मागविणेत येत आहेत. लिफाफा क्र. १ मध्ये आवश्यक कागदपत्रे (बयाणा पावती, नोंदणी प्रमाणपत्र, आयकर / जी एसटी प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड वगैरे) व लिफाफा क्र.२ मध्ये दर भरलेले निविदा फॉर्म जोडणेचे आहेत.

(शिक्का)

सही /- **मुख्याधिकारी**
वडगाव नगरपरिषद, वडगाव

---

# मेनन बेअरिंग्स लिमिटेड

सी आय एन : L29130PN1991PLC062352
नोंदणीकृत कार्यालय : जी–१, एमआयडीसी, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर. ४१६२३४,
फोन नं. ०२३१–२६७२२७९/५३३/४८७ फॅक्स नं. ०२३१–२६७२२७८,
ई–मेल : adminmenonbearings.in संकेतस्थळ : www.menonbearings.in

## टपाल मतपत्रिका सूचना

मेनन बेअरिंग्स लिमिटेड ('कंपनी')च्या सदस्यांना कळविण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ ('अधिनियम') मधील कलम १०८ व ११०, तसेच कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ ('नियम') मधील नियम २० व २२, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ ('लिस्टिंग नियम') मधील नियम ४४, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सचिवीय मानक – २ ('एसएस–२') आणि **दिनांक २२ सप्टेंबर, २०२५** चा सामान्य परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ व यापूर्वी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') यांनी जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांनुसार (एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके'), तसेच अधिनियम, नियम, विनियम, परिपत्रके व अधिसूचना यांच्या इतर लागू तरतुदीनुसार, कंपनीच्या **दिनांक ३ मार्च, २०२६** च्या पोस्टल बॅलेट नोटीसमध्ये नमूद केलेल्या विशेष कामकाजासाठी सदस्यांची संमती व मान्यता इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान ('रिमोट ई–वोटिंग') द्वारे पोस्टल बॅलेट प्रक्रियेद्वारे घेण्यात येत आहे. सदर सूचना कंपनीच्या **www.menonbearings.com** या संकेतस्थळावर तसेच बीएसई, एनएसई आणि एमयूएफजी इंटाईम यांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

वरील तरतुदींनुसार, कंपनीने पोस्टल बॅलेटची सूचना व त्यासोबत स्पष्टीकरणात्मक निवेदन केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्या सर्व सदस्यांना पाठविली आहे, ज्यांचे ई–मेल पत्ते कंपनी, डिपॉझिटरी पार्टिसिपंट ('डीपीज') किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ('आरटीए') कडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे **शुक्रवार, ३ एप्रिल, २०२६** या कट–ऑफ दिनांकास सदस्य नोंदवही / लाभधारक यादीत आहेत. एमसीए परिपत्रकांनुसार सवलतीमुळे प्रत्यक्ष प्रती पाठविण्यात आलेल्या नाहीत.

कंपनीने सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता यावे यासाठी एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांची नियुक्ती केली आहे. रिमोट ई–वोटिंग कालावधी **शुक्रवार, १० एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ९.००** वाजता सुरू होईल आणि **शनिवार, ९ मे, २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता** समाप्त होईल. त्यानंतर ई–वोटिंग सुविधा बंद केली जाईल. सदस्यांचे मतदान हक्क त्यांच्या कंपनीतील भागभांडवलाच्या प्रमाणात, कट–ऑफ **दिनांक ३ एप्रिल, २०२६** नुसार ठरविण्यात येतील.

कंपनीच्या संचालक मंडळाने ३ मार्च, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत, श्री. सीएस मनीष बलदेवा (एफसीएस ६१८०, सी.पी. क्रमांक ११०६२), एम बलदेवा असोसिएट्स, मुंबई यांची पोस्टल बॅलेट प्रक्रियेचे परीक्षण करण्यासाठी स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे. पोस्टल बॅलेटचा निकाल मंगळवार, १२ मे, २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता जाहीर केला जाईल. निकाल व स्क्रुटिनायझरचा अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर अपलोड केला जाईल तसेच स्टॉक एक्सचेंज व एमयूएफजी इंटाईम यांच्या संकेतस्थळांवरही प्रदर्शित केला जाईल.

आवश्यक बहुमताने मंजूर झाल्यास, ठराव शनिवार, ९ मे, २०२६ (ई–वोटिंगचा शेवटचा दिवस) रोजी मंजूर झाल्याचे समजले जाईल आणि ते सर्वसाधारण सभेत मंजूर झाल्याप्रमाणे मानले जातील.

ज्या सदस्यांनी अद्याप आपला ई–मेल पत्ता नोंदवलेला नाही त्यांनी तो (१) डिमॅट खात्यासाठी संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे आणि (२) भौतिक शेअर्ससाठी आयएसआर–१ फॉर्म भरून एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई येथे सादर करून नोंदवावा / अद्यतनित करावा.

ई–वोटिंग संदर्भात काही अडचण असल्यास, Instavote संकेतस्थळावरील FAQ किंवा मार्गदर्शक पाहावा किंवा श्री. राजीव रंजन (एमयूएफजी इंटाईम) यांच्याशी संपर्क साधावा (फोन: ०२२ – ४९१८६००० / ई–मेल: **enoticeslinkintime.co.in**).

**स्थळ : कोल्हापूर**
**दिनांक : ०९ एप्रिल २०२६**

**मेनन बेअरिंग्स लिमिटेड** करीता
सही/–
कंपनी सचिव आणि कम्प्लायन्स ऑफिसर

---

## जाहीर नोटीस

**मे. उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा)** कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोशिएशन लि. कोल्हापूर यांचे कार्यालय यांचे समोर........

**गणेश अर्बन सहकारी पतसंस्था मर्या., चंदगड**
मु. पो. चंदगड ता. चंदगड जि. कोल्हापूर
विरुध्द

| अ. नं. | दावा क्रं. | जाबदाराचे यांचे नाव व पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ४१४/ २०२६ | **जाबदार क्रं. १ श्री. गणपत गुंडू कांबळे पैकी** मु. पो. पाटणे ता चंदगड जि.,कोल्हापूर **जाबदार क्रं. २ श्री. सुनिल गोपाळ कांबळे** मु. पो. कोकरे ता चंदगड जि.,कोल्हापूर | १,३०,१४१/- |
| २ | ४१५/ २०२६ | **जाबदार क्रं. १ श्री. महादेव धानबा तेजन पैकी** मु. पो. केरवडे ता चंदगड जि.,कोल्हापूर | ८,३५,८२७/- |
| ३ | ४१६/ २०२६ | **जाबदार क्रं. १ सौ. अंजली अमृत गावडे पैकी** मु. पो. पार्ले ता. चंदगड जि. कोल्हापूर **जाबदार क्रं. २ सौ. सरिता बाबू गावडे** मु. पो. पार्ले ता. चंदगड जि. कोल्हापूर | ४७,५४८/- |
| ४ | ४२१/ २०२६ | **जाबदार क्रं. १ श्री. मुस्ताक युसूप मुल्ला पैकी** मु. पो. आंबेडकर नगर ता. चंदगड जि. कोल्हापूर **जाबदार क्रं. २ श्री. इब्राहीम अब्दुलरशीद मदार** मु. पो. आंबेडकर नगर ता. चंदगड जि. कोल्हापूर **जाबदार क्रं. २ श्री. राजेंद्र गोपाळ हवालदार** मु. पो. रामदेव गल्ली ता. चंदगड जि. कोल्हापूर | ४१,४४३/- |
| ५ | ४२२/ २०२६ | **जाबदार क्रं. १ श्री. श्रीकांत जर्नादन मोरबाळे पैकी** मु. पो. सरोळी . ता. गडहिंग्लज जि. कोल्हापूर | ४३,०२९/- |

ज्या अर्थी अर्जदार पतसंस्थेने जाबदार यांचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणे अन्वये प्रकरण दाखल केलेले आहे. वर नमूद केलेले जाबदार या नोटिसीने आपणांस अर्जदार पतसंस्थेने दिलेल्या पत्यावर नोटीस पाठवूनही लागू होत नसलेने आपणास या जाहीर नोटीसव्दारे फर्मावित येत की,

सदर दाव्या संबंधित आपण दि. २२/०४/२०२६ इ. रोजी,ठीक सकाळी ११.३० वाजता हजर राहून आपले म्हणणे मांडावे. आपण हजर न राहिलेस आपले गैरहजेरीत अर्जाची चौकशी केली जाईल व योग्य तो निर्णय दिला जाईल. म्हणून दिली जाहीर नोटीस दि. ०८/०४/२०२६ इ. रोजी माझी सही, कार्यालय मुद्रेसह.

(शिक्का)

सही/–
**सुखदेव सुर्यवंशी**
उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा)
कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोशिएशन लि. कोल्हापूर

कॅम्प कार्यालयाचा पत्ता: –
कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. कोल्हापूर
यांचे कार्यालय– ७२६/ए, साई प्लाझा २ रा मजला, शाहूपुरी ३री गल्लीपार्श्वनाथ बँकेसमोर, कोल्हापूर

---

## मलकापूर नगरपरिषद, मलकापूर

**(जन्म – मृत्यू विभाग)**
**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार व**
**असाधारण क्रमांक ११५**
**अधिसूचना**

मलकापूर शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, ज्या नागरिकांची जन्म नोंद मलकापूर परिषदचे जन्म नोंद रेकार्डला आहे त्यांना त्यांचे नाव जन्म रेकार्डला नोंद करण्याकरिता यापूर्वी दिनांक १४/०५/२०२० पावेतो मुदत वाढ देण्यात आली होती परंतु अद्याप पावेतो बऱ्याच नागरिकांनी त्यांचे जन्म नोंदणीमध्ये नावाची नोंद केलेली नाही.

करिता महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार – व क्रमांक ११५ अन्वये शेवटची संधी म्हणून जन्म नोंदणीमध्ये आपले नाव नोंदविण्याकरिता दिनांक २७/०४/२०२६ पावेतो मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

तरी ज्या नागरिकांची मलकापूर नगरपरिषद जन्म नोंदणी रेकार्डला जन्म नोंद आहे. परंतु त्यांनी बाळाचे नावाचे ठिकाणी आपले नावाची नोंद केलेली नाही अशा सर्व नागरिकांनी दिनांक २७/०४/२०२६ पूर्वी आपले नावाची नोंदणी करून घ्यावी. यानंतर जन्म नोंदणीमध्ये नावाची नोंद घेण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

जन्म नोंदणीमध्ये नावाची नोंद करण्याकरिता अर्ज सोबत पुढील पैकी कोणतेही (दोन) शासकीय पुराव्याच्या स्वसाक्षांकित प्रती सादर करावे. उदा. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड, वाहन परवाना, शासकीय कार्यालयातील कर्मचारी असल्यास त्या कार्यालयाचे ओळखपत्र.

सही– **मुख्याधिकारी,**
मलकापूर नगरपरिषद

---

# आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

Aadhar Housing Finance Ltd

**कॉर्पोरेट कार्यालय :** युनिट क्र. ८०२, नटराज रुस्तमजी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे आणि एम. व्ही. रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०००६९.
**कोल्हापूर शाखा :** तिसरा मजला, शॉप नं. ३०२, ३०४, ३०६, वसंत प्रेस्टिज, ई वॉर्ड, पाच बंगला, सर्व्हे नं. १११०, शाहूपुरी, कोल्हापूर – ४१६००१, महाराष्ट्र.

## ई-लिलाव - विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई–लिलाव विक्री सूचना.

याद्वारे सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे गहाण ठेवली आहे आणि जिचा ताबा **आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती मालमत्ता कोणत्याही कोणत्याही बोजाशिवाय "**जे आहे जिथे आहे**", "**जे आहे जसे आहे**" **आणि "जे काही आहे**" या तत्त्वावर खालील तपशिलानुसार विकली जाईल:

| अ. क्र. | कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदार | मागणी सूचना तारीख व रक्कम | स्थावर मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (आरपी) | ईएमडी (आरपीच्या १०%) | ताब्याचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज कोड क्र. १०६०००००७२ / कोल्हापूर शाखा सविता दिनकर साळोखे (कर्जदार) दिनकर बापू साळुंखे (सह–कर्जदार) अर्जुन श्रीकांत यादव (जामीनदार) | **१५–०४–२०२१ आणि रु. २७,७०,७०४/–** | संपूर्ण भूभाग आणि मालमत्ता: प्लॉट नं. ९ आणि १०, येडेकर मळा, नागोबा मंदिर, गांधीनगर रेल्वे स्टेशन जवळ, मुडशिंगी, जि. कोल्हापूर, महाराष्ट्र – ४१६११९ येथील जमीन. **चतु:सीमा:** पूर्व: प्लॉट नं. ७ आणि ८ ची मालमत्ता, पश्चिम: प्लॉट नं. ११ ची मालमत्ता, उत्तर: रस्ता, दक्षिण: प्लॉट नं. ३ आणि ६ ची मालमत्ता. | रु. ३०,९६,०००/– | रु. ३,०९,६००/– | **प्रत्यक्ष ताबा** |

१. ईएमडी साठी डिमांड ड्राफ्ट, केवायसी, टेंडर फॉर्म आणि मान्य अटी व शर्ती (टेंडर कागदपत्रे) जमा करण्याची अंतिम तारीख **२९–०४–२०२६ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत** वर नमूद केलेल्या शाखेच्या पत्त्यावर किंवा **https://bankeauctions.com** वर अपलोड करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेली कागदपत्रे अवैध मानली जातील. ईएमडीवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
२. मालमत्तेसाठी बोली/ऑफर उघडण्याची तारीख (लिलाव तारीख) **३०–०४–२०२६ रोजी सकाळी १०:०० ते ११:०० या वेळेत https://bankeauctions.com वर असेल.**
३. मालमत्तेवर प्रलंबित असलेल्या कोणत्याही दायित्वासाठी एएचएफएल जबाबदार नाही. मालमत्तेचा लिलाव '**जे आहे जिथे आहे**' या तत्त्वावर केला जाईल.
४. डिमांड ड्राफ्ट केवळ 'आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड' च्या नावे असावा.
५. लिलाव/बोली केवळ **https://bankeauctions.com** या वेबसाईटद्वारे "ऑनलाईन इलेक्ट्रॉनिक बिडिंग" द्वारे होईल. बोलीदारांनी सहभागी होण्यापूर्वी सविस्तर अटींसाठी वेबसाइट पहावी.
६. इच्छूक बोलीदारांनी त्यांचे नाव **मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** पोर्टलवर **https://bankeauctions.com/registration/signup** या लिंकद्वारे नोंदवावे आणि त्यांचे यूजर आयडी आणि पासवर्ड विनामूल्य मिळवावा. संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता **मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** कडून ई–लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात.
७. अधिक तपशीलासाठी **आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी, सद्दाम हुसेन चौहान (मो. ९६६०३६४२०५)** किंवा सेवा प्रदाता मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, **श्री. प्रभाकरन (मो. +९१-७४१८२-८१७०९, ई-मेल: tn@c1india.com आणि support@bankeauctions.com, फोन: +९१७२९१९८११२४/२५/२६)** यांच्याशी संपर्क साधावा. आजच्या तारखेनुसार, एएचएफएल किंवा एएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्याला वरील स्थावर मालमत्ता विकण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास मनाई करणारा कोणताही न्यायालयीन आदेश नाही.
८. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया सुरक्षित धनकोची (एएचएफएल) वेबसाइट **www.aadharhousing.com** पहा.
९. लिलावासाठी बोली वाढीची रक्कम **रु. १०,०००/–** आहे.
१०. ही वर्तमानपत्रातील जाहिरात आणि त्यातील माहिती सामान्य जनतेसाठी आहे. या मजकुराचे कोणत्याही माध्यमातून अनधिकृत पुनरुत्पादन किंवा वितरण केल्यास एएचएफएल योग्य कायदेशीर कारवाई करू शकते.

**स्थळ : महाराष्ट्र,**
**दिनांक : १०.०४.२०२६**

**सही/– अधिकृत अधिकारी**
**आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

---

# चंदगड नगरपंचायत, चंदगड

**ता.चंदगड, जि.कोल्हापूर**

जा.क्र./कर/ ४०२ / २०२६
दि. ९/०४/२०२६

Email: chandgadnagarpanchayat@gmail.com

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १२९ खंड (१) व (२) अन्वये चंदगड नगरपंचायत हद्दीतील मिळकतीच्या असेसमेंट दफ्तरी नावात बदल करणेकामी इकडे प्राप्त झालेल्या मागणीस अनुसरून खालील नमूद असलेल्या मिळकतीबाबत ज्या व्यक्तिच्या हरकती/आक्षेप असलेस आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह, सदरची जाहिरात सूचना प्रसिद्ध झालेपासून दिनांक २४/०४/२०२६ पर्यंत मुख्याधिकारी, चंदगड नगरपंचायत, चंदगड याचेकडे कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात पुराव्यासह सादर कराव्यात, मुदतीनंतर प्राप्त सूचना अगर हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | मिळकत क्र. | कर आकारणी नोंद वहीवरील सध्या असलेले नाव | हस्तांतराची नोटीस देणाऱ्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन | नवीन | कृष्णा मनोहर चव्हाण | ७-१२ प्रमाणे नोंद होणेबाबत |
| २ | नवीन | नवीन | रणजीत शिवाजीराव पाटील | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| ३ | २३५५ | शांता प्रभाकर तोरस्कर | प्रकाश प्रभाकर तोरस्कर | मिळकत नं. २३५५ मध्ये दोन भाग करून मिळणेबाबत. |
| ४ | नवीन | नवीन | हसीना इस्माईल मदार | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| ५ | ४३५९ | विष्णू दत्तू तरवाळ | विष्णू दत्तू तरवाळ | नवीन इमारत नोंद करणे |
| ६ | २५४० | रेखा लक्ष्मण नाईक | संजय लक्ष्मण नाईक | सात-बारा प्रमाणे मिळकतीस नाव नोंद होणेबाबत. |
| ७ | ४३५७ | मोहसिन अब्दुलरहीम पटेकरी | मोहसिन अब्दुलरहीम पटेकरी | नवीन इमारत नोंद करणे |
| ८ | नवीन | नवीन | दिपक पुनाजी गावडे | नवीन इमारत नोंद करणे |
| ९ | २८१५ | बेबी सादिक शेख | बेबी सादिक शेख | नवीन इमारत नोंद करणे |
| १० | नवीन | नवीन | मोहसिन अब्दुलरहीम पटेकरी | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| ११ | २४४८ | इंदूबाई नारायण गावडे | अलका प्रल्हाद कांबळे | सात-बारा प्रमाणे मिळकतीस नाव नोंद होणेबाबत. |
| १२ | नवीन | नवीन | कमल अनिल मोरे | गट नं.८१६ मधील जागेस भोगवटादार म्हणून नाव नोंद होणेबाबत. |
| १३ | नवीन | नवीन | अमोल अशोक जाधव | मिळकतीस भोगवटादार नाव नोंद होणेबाबत. |
| १४ | ४२०८ | अब्दुलसत्तार आब्बास मुल्ला | अब्दुलसत्तार आब्बास मुल्ला | मि. नं. ४२०८ नवीन इमारत नोंद होणेबाबत. |
| १५ | १६७१ | उत्तम मधुकर सावंत | अजित अनिल शिंदे | गट न. ६३५-१ मधील जागेस भोगवटादार म्हणून नाव नोंद होणेबाबत. |
| १६ | नवीन | नवीन | नागेश शंकर पाथरूट | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| १७ | नवीन | नवीन | आंबुताई सुरेश माडमगिरी | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| १८ | नवीन | नवीन | राजाराम बाळू गावडे | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| १९ | १०९० | अब्दुलसत्तार महमद शहा | इम्रान अब्दुलसत्तार शहा | सात-बारा प्रमाणे नाव नोंद होणेबाबत. |
| २० | २६६५ | बसवराज शिवमूर्ती काजगार, विजयालक्ष्मी बसवराज काजगार | विजयालक्ष्मी बसवराज काजगार | मिळकत नं. २६६५ मध्ये दोन भाग करून मिळणेबाबत. |
| २१ | नवीन | नवीन | रब्बानी हुसेन मुल्ला | गट नं. १९० मधील खुली जागा नोंद होणेबाबत. |
| २२ | १३९७ | यशोदा रावजी गावडे | यशोदा रावजी गावडे | मिळकत नं. १३९७ मध्ये घर नोंद करणे |
| २३ | ६४४ | महमद हुसेन इदृस नाईक | अझरुद्दीन अब्दुलगफार मकानदार | मि.नं. ६४४ ला फेरफार नाव नोंद होणेबाबत. |
| २४ | नवीन | नवीन | अब्दुलरशीद इब्राहीम कदिम | सात – बारा प्रमाणे नवीन इमारत नोंद करून दोन भाग करणेबाबत. |
| २५ | नवीन | नवीन | वसीम अन्वर पठाण | अर्जदार यांच्या अर्जाप्रमाणे गट नं.१९२ / क मधील नवीन इमारत नोंद करुन अर्जदार यांचे ना भोगवटादार म्हणून नोंद करणे. |

(शिक्का)

सही/– **प्रशासकीय अधिकारी**
चंदगड नगरपंचायत, चंदगड